PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 6, ISSUE 2

# पंरपरागत कुटीर उद्योग करणाऱ्या (बलुतेदारांच्या) कारागिरांच्या जीवनांचे अध्ययन

**कु. पल्लवी एस. खोके**
पीएच. डी. रिसर्च स्कॉलर
सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर
**महाराष्ट्र भारत**

**डॉ. के. बी. मोहरीर**
प्रोफेसर, रिसर्च गाईड
सरदार पटेल महाविद्यालय चंद्रपूर
**महाराष्ट्र भारत**

## सारांश :—

भारतीय ग्रामीण समुदायाचे जजमानी व्यवस्था किंवा बलुतेदारी ही एक अतिशय महत्वाचे वैशिष्टये आहे. विविध जाती व्यवस्था भारतीय समाजात आहे. जजमानी व्यवस्था म्हणजे ग्रामीण विभागातील वेगवेगळया जातीचा आंतर संबंधाची व्यवस्था होय. शेती आणि शेती व्यवसायाशी संबंधीत व्यवसाय कुणी करावे. मोबदला कसा देण्यात यावा, या सर्व गोष्टी जजमानी व्यवस्थेद्वारे निश्चित केलेल्या असायच्या ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था म्हणजे जजमानी व्यवस्था होय. ग्रामीण विभागातील अर्थव्यवस्थेत खेडयातील विविध जातीद्वारे आर्थीक दृष्टीने प्राचीन भारतीय खेडी स्वंयपूर्ण होती. ग्रामीण भागातील लोकांच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी स्वतंत्र अशी यंत्रणा उभी केली होती. शेती हा ग्रामीण भागातील जनतेचा मुख्य व्यवसाय होता. त्यामुळे शेती व्यवसायांशी संबधित ज्या ज्या सेवा आवश्यक होत्या. त्या त्या जातीतील म्हणून पारंपारिक पध्दतीने देण्याची एक विशिष्ट यंत्रणा निर्माण करण्यात आली होती. यालाच 'बलुतेदार' किंवा 'जजमानी' असे म्हणतात.

**बिज शब्द :—** जजमानी, ग्रामीण, शेती, जाती व्यवस्था, रोजगार उद्योग.

**प्रस्तावना :—**

प्राचीन काळापासून भारतीय समाजात बलुतेदारी पध्दती अस्तित्वात होती. जातीय व्यवस्थेवर आधारित असलेली बलुतेदारी पध्दती ही एक आर्थीक व्यवस्था आहे. कारण ग्रामीण भागातील शेतीच्या उत्पादनामध्ये बलुतेदारातील सर्व जातींचा महत्वाचा समावेश असतो. आपापल्या जातीच्या व्यवसायानुसार सर्व जातीचे लोक सर्व शेतक—यांना सेवा देतात आणि नंतर त्यांना त्या

सेवांचा मोबदला हा जातीच्या दर्जानुसार व परंपरेच्या आधारावर दिला जातो. भारतीय ग्रामीण समुदायातच आपल्याला बलुतेदारी पध्दती आढळून येते. सर्वात प्रथम भारतीय बलुतेदारी प्रथेचे सविस्तर वर्णन 'विलीयम वाइजर' (Wiliam Wiser) यांनी जीम Indian Jajmani System या ग्रंथात केले.

**व्याख्या :—**

१) एन. एस. रेड्डी (N.S. Reddi)

''जे सेवा संबंध (बलुतेदारी) वंश परंपरागत अधिकाराने शासित होतात. त्यास जजमान — परजान असे म्हणतात.

त्रि. ना. अत्रे यांनी 'गावगाडा' या प्रस्तुत पुस्तकात बलुतेदारी पध्दती आणि ती निर्माण कशी झाली या संबंधीचे विवेचन केले आहे. त्रि. ना. अत्रे म्हणतात गाव हे कुणब्यांनी बसविले आणि काळी उचलली व आपल्याला आवश्यक अश्या जातीना आपला धंदा पार पाडण्याला व प्रंपचाची काम करून घेण्यासाठी कुणाचीतरी गरज होती म्हणून कुणब्यांने गावात आपल्या बरोबर अडाणी आणले म्हणजे पाहिले कारू आणले व नंतर नारू आले. शेतक—याला, कुणब्याला ज्याचे व्यवसाय जास्त महत्वाचे अश्या जातीतील लोकांना कारू म्हणत व ज्या जातीतील लोकांना कारू म्हणत व ज्या जातीतील लोकांच्या व्यावसायिकांच्या सेवेवाचून त्यांचे नडत नसे अश्याना नारू म्हणत असे बलुतेदार किंवा बलुत्या असे कारूला आणि अलुतेदार किंवा अलुत्या असे नारूला संबोधले जाई. व यासर्वांना त्यांनी केलेल्या कामाचा मोबदला म्हणून धान्य दिल्या जाई. हे सर्व बलुतेदार व अलुतेदार, पेंढीकाडी, आय घुगरी, सलई, भिकणे शेर इत्यादी नावाने ओळखले जात असे.

महार, सुतार, लोहार, गुरव, परीट, जीशी, सोनार, न्हावी, कुंभार, चांभार, कोळी यांना बलुतेदार किंवा बायकारू म्हटले जाई तर भोई, तराल, कलावंत, धडसी, वाजंत्री, मुलांना, जंगम, गोसावी, ठाकर, डोत्या भाट, गोंधळी, माळी, शिंपी, सजगर, साळी, तांबाडी आणि तेली यांना अलुतेदार किंवा अठरानारू असे समजले जाई. यातील काही जाती त्यांना शेतीसाठी आवश्यक अवजारे बनविणे व ते दुरूस्त करणे असे काम करित तर काही जाती प्रांपचिक जिवनात मदत करीत होते. तर काही धार्मिके कार्य तर काही व्यवहारिक कार्य इत्यादी कामात मदत करीत होतो. बलुतेदारी जातीसंबंधावर आधारीत असलेली ग्रामीण अर्थव्यवस्था होय. म्हणून पूर्वी ग्रामीण अर्थव्यवस्था ही स्वय:पूर्ण होती गावातील गरजा गावतच पूर्ण होत होत्या.

**उद्दिष्टे :—**

१. बलुतेदारीची व्याख्या स्पष्ट करणे.
२. बलुतेदाराच्या कार्याचे अध्ययन करणे.
३. बलुतेदारी पध्दतीचे वैशिष्टये जाणून घेणे.
४. बलुतेदारी पध्दतीच्या विघटनाची कारणे जाणून घेणे.

**बलुतेदारी पध्दतीचे वैशिष्टये :—**

वंशपरंपरागत व्यवस्था म्हणून बलुतेदारी पध्दतीला ओळखल्या जाते. व्यक्तीच्या गुणांवरून व्यक्तीची जात ठरविली जात नाही. तर त्याच्या जन्मावरून ठरते. तसेच प्रत्येक जातीतील लोकांच्या व्यवसाय, उद्योग हा सुध्दा परंपरागत व निश्चित असतो. प्रत्येकच व्यक्तीला वडिलोपार्जित आणि वंशपरंपरागत व्यवसाय करावा लागतो. यामुळेच पिढयानपिढया विशिष्ट एका कुटुंबाची सेवा करण्याचे अधिकार चालत येतात. सेवा देणे आणि घेणे हा अधिकार कोणत्याही पुस्तकात लिखीत नसुन तो परंपरागत चालत आलेला आहे. याकारणाने विशिष्ट कुटुंब आणि बलुतेदार यांचे संबध हे कधीही न संपन्नारे आहे. हे संबध बलुतेदाराच्या दृष्टीने उदरनिर्वाहाशी संबधीत आहे. तसेच कधीही कोणीही तोडू शकत नव्हते. यामुळे बलुतेदाराला विशिष्ट कुटुंबावरच आपल्या उपजिविकेसाठी अवलंबून राहावे लागत असे.

बलुतेदारांचे महत्वाचे वैशिष्टये म्हणजे सेवांच्या मोबदल्यास वस्तुची देवाणघेवाण करणे काळी, परीट, सोनार, न्हावी, कुंभार, चांभार, लोहार, सुतार, महार इत्यादी जातीच्या लोकांनी विशिष्ट कुटुंबाला आपल्या सेवा दयायचा व त्याचा मोबदला म्हणून त्यांना भाजीपाला, अन्नधान्य इत्यादी वस्तू दिल्या जात असत. तसेच श्रमविभाजनाची व्यवस्था हे सुद्धा वैशिष्ट आहे. यात प्रत्येक जात ठराविकच लोकांना आपआपलेच कामे कराचे व प्रत्येक लोकांना त्यांच्या गरजेनुसार त्या सेवा दयाच्या व आपण सुध्दा द्याच्या परंपरेद्वारे कुणी कुणाकडे आपल्या सेवा दयाच्या हे निश्चित होते. त्यामुळे त्यासंदर्भात स्पर्धा ही व्यावसायिक जातीमध्ये नसायची तसेच या बलुतेदारी पध्दतीमध्ये आर्थीक संरक्षण सुध्दा मिळत असे संकटाच्या किंवा महत्वाच्या प्रसंगी बलुतेदारांना यजमान कुटुंब मदत करीत असत. तसेच यासोबतच मानसिक व सामाजिक संरक्षण सुध्दा बलुतेदारी पध्दतीमुळे मिहाचे वरील सर्व बलुतेदारी पध्दतीची वैशिष्टये आहे.

**बलुतेदारी पध्दतीच्या विघटनाची कारणे :—**

भारतातील ग्रामीण विभागातील बलुतेदारी पध्दतीचे विघटन बदलत्या परिस्थितीच्या दवाबामुळे झाले आहे. स्वातंत्र्यानंतर औदयोगिकरण नवीन कायदे, राजकीय जागृती सामाजिक आणि व्यावसायिक गतिशिलता, शिक्षण, नागरीकरण इत्यादी कारणांमुळे महत्वपूर्ण परिवर्तन बलुतेदारी पध्दतीमध्ये घडून आले व या परिवर्तनाची गती इतकी तीव्र होती की, याचा परिणाम बलुतेदारीवर झाला व मागील ३०—४० वर्षाच्या कालावधीत ही बलुतेदारी पध्दती जवळजवळ नष्टच झाली. आता पैसाला महत्व आले आहे. पैसाचे व मुद्रेचे वाढते महत्व याकारणांनी बलुतेदारी पध्दतीवर (परंपरागत व्यवसायावर) मोठा आघात झाला. कालांतराने अनेक बदल घडून आले. मुलांच्या आवडी—निवडी बदलू लागल्या. भारतीय औद्योगिकरणाचा इंग्रजांनी भारतात पाया घातला. औद्योगिकरणाची गती वाढली. त्यामुळे मोठमोठे कारखाने निर्माण झाले त्याचा विपरित परिणाम ग्रामीण विभागावर झाला. ग्रामीण कारागिरांना पैसाचे आमीष दाखवून शहरात बोलवण्यात येवू लागले. मुद्रेचे महत्व वाढत गेले. कोणत्या जातीने कुणाकडे व्यवसाय करावा इत्यादी बाबतीत प्रत्येकाला स्वातंत्र्य देण्यात आले. विज्ञानाचा विकास, शिक्षण, औद्योगिकरण, आधुनिक काळात लोकशाही मुल्ये इत्यादींमुळे नवनवीन मुल्य अस्तित्वात आली. यामुळे लोकांना जुन्या श्रद्धा आणि

परंपरा याचावरचा विश्वास कमी झाला. कालांतराने शिक्षणाचे महत्व वाढले त्यामुळे कारागिरांच्या मुलांचे शिक्षणाकडे लक्ष वाढत गेले. परंपरागत व्यवसाय त्यामुळे नाहीसे झाले. तसेच मोठया प्रमाणात दळणवळणाच्या साधनात वाढ झाली. शहरांपासून तर प्रत्येक खेडयापर्यंत रस्ते तयार करण्यात आले. त्याकारणाने शहरांशी लोकांचा संपर्क वाढला. यासर्व कारणाने शहरात व्यवसाय करू लागले.

इत्यादी वरील अनेक कारणांनी बलुतेदारी पध्दतीचे विघटन झाले.

**निष्कर्ष :**

१. पुर्वी ग्रामीण अर्थव्यवस्था स्वय:पूर्ण होती.
२. कुणब्यांनी गावात बलुतेदारांना आणले.
३. कोणत्या जातीने कोणते काम करावे हे निश्चित होते.
४. बलुतेदारांना अडचणीच्यावेळेच यजमान कुंटुब मदत करत होते.
५. बलुतेदारांना विशिष्ट कुंटुबावरच आपल्या उपजिविकेसाठी अवलंबून राहावे लागत असे.

## संदर्भ ग्रंथसुची :—

६. ग्रामीण आणि नागरी समाजशास्त्र — डॉ. प्रदिप आगलावे
साईनाथ प्रकाशन,
धरमपेठ नागपूर
प्रथम आवृत्ती २००२

७. 'गावगाडया बाहेर' — प्रभाकर मांडे
मंगेश प्रकाशन,
महाल नागपूर १९७५

८. 'कुटीर एव लघु उद्योग' — डॉ. रमाशंकर श्रीवास्तव
ज्ञानदा प्रकाशन,
नवी दिल्ली १९७२